# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/04/2023 (मंगळवार) दुपार

---

## विनयभंग

पो.स्टे. सावनेर :— दिनांक १७/०४/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान यातील नागपूर ते सावनेर रोडवर मानेगाव ते टाकळी गावाचे मधात मानेगाव शिवारात शेतीतील १/३ शेती फिर्यादी वय ८० वर्ष यांच्या वडीलांच्या नावावर होती. फिर्यादीचे वडील मरण पावल्यावर तिच्या चुलत्यांनी ७/१२ वरून नाव कमी केले. त्या संबंधाने धनराज कुकडे **आरोपी नामे— १) माया जयवंत कुकडे, रा. मानेगाव ता. सावनेर २) मंगला धनराज कुकडे, मानेगाव ता. सावनेर ३) प्रशांत धनराज कुकडे, रा. मानेगाव ता. सावनेर ४) पंकज धनराज कुकडे मानेगाव ता सावनेर ५) नानुबाई पांडे हिचा मुलगा नाव माहीत नाही रा. खुमारी ता. सावनेर ६) रूपाली व तिचे पति नाव माहित नाही रा. माळेगाव ता. सावनेर ७) झामो छन्नुजी चौधरी रा. मानेगाव ता. सावनेर ८) विमल पंजाबराव डीमके** व सोबत असलेले काही ग्रामस्थ सर्व आरोपींतां विरूदध कोर्टात केस दाखल केली असुन शेतीची वहीवाट करण्याकरीता फिर्यादी गेले असता आरोपीतांनी तुम्ही कशी काय शेती करत आहात म्हणुन झगडा भांडण करून त्यापैकी प्रशांत धनराज कुकडे, पंकज धनराज कुकडे यांनी फिर्यादीला आई बहिणीच्या शिवीगाळ देवुन फिर्यादीच्या मुलीच्या अंगाला नको तेथे हात लावला व सोबतच्यांनी हल्ला चढवुन दगडफेक केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम १४३, ३३६, ३५४, ३७९, ५०४, ४०६ भा.द.वि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. नागवे पोस्टे सावनेर मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. केळवद :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा केळवद टाउन येथे दिनांक २२/०३/२०२३ चे २१/५७ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— मनोजकुमार राजमनी तिवारी वय ४३ वर्ष, रा. ग्राम याने त्याचे युनियन बँकेचे सेव्हींग अकांउट वर येणारे पेमेंटचे पैसे जमा झाले नाही या करिता चौकशी करणे कामी मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता नमुद मोबाईल धारकाने फिर्यादीच्या अंकाउंट वरील फोन क्रमांका वरुन त्याचे ट्रांझेक्शन आय. डी. वरून असे एकुण ३५,०५१/— रुपये ट्रान्सफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवी ६६ (सी), ६६(डी) माहीती तंत्रज्ञान अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. आत्राम मो. नं. ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :–** अंतर्गत ०६ किमी अंतरावर इनोव्हेटीव डिझायनर्स ॲन्ड कंसल्टन्स कंपनी MIDC बोरी येथे दिनांक २७/०३/२०२३ चे २१.०० वा. ते दि. २८/०३/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अतुल विलास जोशि, वय ३५ वर्षे रा. मनिश नगर नागपूर हे आपली डयुटी संपवून घरी गेले होते. तेव्हा दुसऱ्या दिवशी कंपनीतील कामगार याने फोन करून कंपनीत चोरी झाल्याबाबत माहीती दिली तेव्हा फिर्यादी यांनी येवून पाहणी केली असता १) वेल्डीग मशीन सिंगल फेज २ नग २) सप्लायर केबल १४५ मिटर ३) मॅगनेटीक ड्रील मशीन १ नग ४) वेल्डींग होल्डर ३ नग ५) वेल्डींग केबल ११० मिटर ६) अर्थिंग केबल १५ मिटर ७) एल. पी. जी. कमर्शल सिलेंडर १ नग ८) ग्रॅन्डींग ॲन्ड कटींग व्हील ४० नग ९) ए.जी. ४ गॅन्डर १ नग १०) वेल्डींग मशीनचे सामान व लोहा असा एकूण ५७०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशि विनायक सातव मो. क्र. ७२१९८२९७७१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**